## <u>प्रकरण दुसरे</u> – <u>मुधोजी ( चौथे ) उर्फ बापूसाहेब</u> ( इ.स. 1860 ते इ.स. 1916 )

## यांची कारकिर्द

## प्रकारण दुसरे

### मुधोजी (चौथे ) उर्फ बापूसाहेब (इ.स. 1860 ते इ.स. 1916 )

20 व्या शतकात फलटण संस्थानात दोन अधिपती होऊन गेले. 1) मुधोजी उर्फ बापूसाहेब महाराज ( 1860 ते इ.स. 1916 ) व 2) शेवटचे मालोजीराव उर्फ नानासाहेब महाराज ( 1916 ते 1948 ) होत. या प्रक्ररणात मुधोजीराव यांची कारकिर्दी व त्यांनी केलेल्या महत्वाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सूधारणा सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुधोजीरावांची कारकिर्द म्हणजे फलटण संस्थानचे आधुनिकिकरण होय. सुदैवाने त्यांनी प्रदिर्घ काळ राज्यकारभार केला व फलटण हे एक मुंबई प्रांतातील प्रगतिशील संस्थान बनले. 1900 पूर्वीची त्याची कारकिर्द दिली आहे. 1900 ते 1916 ची कारकीर्द सविस्तर दिली आहे. कारण तो आपला अभ्यासाचा विषय आहे.

बालपण व दत्तक -

फलटण संस्थानचा राज्यकारभार जानराव नाईक निंबाळकर उर्फ जनोजी दूसरा याने इ. स. 1877 ते 1825 पर्यन्त केला. यांच्याच कारकिर्दीत 1818 ला पेशवाईचे राज्य नष्ट झाल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीने जानराव यांच्याशी 22 एप्रिल 1820 रोजी महत्वाचा करार केला"[1] जानराव नाईक

---

1 Aitchison: Treaties and Engagements Vol.VI and A.R.P.S. 1889-90, Page.1

निंबाळकर 1825 ला मरण पावले त्यास पुत्र नसल्याने त्यांची पत्नी साहेबजीबाई हिने फलटण संस्थानचा राज्यकारभार इ.स. 1825 ते 1853 पर्यन्त दक्ष कारभारी यांच्या मदतीने केला.

तिला अपत्य नसल्याने व फलटण संस्थानास वारस नसल्याने इंग्रज सरकारकडे तिने अर्ज केला. शेवटी तिच्या प्रयत्नास यश येऊन दिनांक 3 डिसेंबर 1841 मध्ये साहेबजीबाई उर्फ बयासाहेब हिला इंग्रज सरकारने दत्तक घेण्याची परवानगी 30,000 रूपये नजराणा देऊन मिळाली."[2]

संस्थानचा भावी अधिपती योग्य असावा व नात्यातील असावा म्हणून साहेबजीबाई निंबाळकर यांनी योग्य मुलग्याचा शोधाशोध करून व सरतेशेवटी तिने आपल्या दिराचा ( जानरावाचा भावाचा ) नातू दत्तक घेण्याचे ठरविले. त्याचे नाव महादजी होते . दत्तक समारंभ फलटणला होऊन त्या मुलाचे नांव मुधोजी असे ठेवण्यात आले. व तो अल्पवयीन असल्याने 1853 पर्यन्त त्याच्यावतीने साहेबजीबाई निंबाळकर ह्याच कारभार पाहात होत्या. मुधोजीराव यांचा जन्म 1837 मध्ये झाला.

अशारीतिने साहेबजीबाई निंबाळकर यांनी दुरदर्शीपणा दाखवून गादीस योग्य वारस दत्तक घेतला. व तोच पुढे आधुनिक फलटण संस्थानचा भाग्यविधाता म्हणून ठरला.

<u>राज्याधिकार</u> – (1860 )

1853 ला मुधोजीरावाची जनक माता साहेबजीबाई उर्फ बयाबाई निंबाळकर हिचे दुर्दैवी निधन झाले. आणि फलटण संस्थान एका कर्तव्यदक्ष राजमातेला मुकले. दत्तक मुलगा मुधोजीराव अल्पवयीन असल्याने इंग्रजानी राज्यकारभार आपल्या हातात घेतला व पुढे 10–2–1860 ला मुधोजीराव हे मेजर झाल्याने राज्यकारभाराचा अधिकार त्यांना दिला"[3] राज्याधिकार सोहळा फलटण ला होऊन इंग्रज अधिकारी व इतर संस्थानिक हजर राहिले व फलटण संस्थानचा अंध:कारमय काळ संपुन भाग्याची नवीन पहाट उजाडली. मुधोजीराव चौथे यांची कारकिर्द वैभवशाली होती यासंबंधी 1934–35 च्या फलटण संस्थानच्या अहवालात पुढील माहिती आढळते –

---

2 पटवर्धन – संस्थानातील लोकशाहीचा लढा – पृ.303

3 कित्ता–

After her death , ( Sahebji Bai ) the British Government administered the State till the 10th February 1360, when Mudhojirao IV alias Bapusaheb the adoptive father of the present Ruler, was invested with ruling power. He ruled for more than half a century from 1860 to 1916. He was appointed a member of the Bombay Legislative Council in 1878 and the title of C.S.I. was conferred on him in 1911. It was under his long and progressive rule that many Schemes of Public utility and works of art seen today in Phaltan were introduced."[4]

सन 1820 मध्ये ब्रिटिशांशी फलटण सरकारचा करार झाला, परंतू 1818 ते 1860 पर्यन्त फलटण संस्थानचा फारसा विकास झाल्याचे दिसून येत नाही. या कालखंडात फलटण संस्थानचा कारभार बराच काल सातारा महाराज व ब्रिटिश सरकारने नेमलेल्या अधिका-यामार्फत चालत असे. इ.स. 1860 मध्ये फलटण संस्थानची मुखत्यारी श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांना मिळाली. इ.स. 1860 ते 1916 पर्यन्त म्हणजेच 56 वर्ष एवढ्या प्रदिर्घ कालावधीत फलटण संस्थानात अनेक मुलगामी सुधारणा त्यांनी केल्या.

<u>मुधोजीरावांचा प्रत्यक्ष कारभार</u>-

1857 ला भरतात ब्रिटिश सत्ते विरूध्द बंड झाले आणि भारतातील ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा शेवट झाला. भारतावर ब्रिटिश सम्राटाचे राज्य सुरू झाले. भारतातील संस्थानावर या सत्तांतराचा निश्चित परिणाम झाला. ब्रिटिश राणीने जाहीरनामा काढून भारतीय संस्थानिकांना अभय दिले व त्यांच्या अंतर्गत कारभारात ब्रिटिश सरकार ढवळाढवळ करणार नाही म्हणून जाहीर केले. तसेच संस्थानिकांना जर

---

4 A.R. General year 1934-35 Page - 3

त्यांना मूळबाळ नसल्यास दत्तक घेण्याची सनद ( adoption Sanad) दिली. त्यामुळे 1857 नंतर कांही संस्थानिकानी आपल्या संस्थानात चांगली कामगिरी करून जनहिताच्या सुधारणा केल्या. त्यास मुधोजीराव हे अपवाद नव्हते. कारण त्यांनी 1860 मध्ये ब्रिटिश सरकारकडून सत्ता मिळाल्यानंतर सहू 1860 ते 1876 पर्यन्त संस्थानातील अनेक बाबतीत त्यांचा नियोजन करण्यामध्ये वेळ गेला व पुढे 1876 ते 1916 या कालखंडात त्यांनी संस्थानात मोठया प्रमाणात सुधारणा करून संस्थान पुरोगामी केले.

मुधोजीरावांचे शैक्षणिक कार्य--

1853 पूर्वी म्हणजेच इंग्रजांनी वुडचा खलिता जाहीर करण्यापूर्वी मुंबई प्रांतात आधुनिक शिक्षण पध्दत नव्हती. पूर्वी मराठी कालात ठराविक जातीमध्ये शिक्षण घेतले जात होते व शिक्षण पूर्णतः धार्मिक पध्दतीचे होते. 1853 नंतर इंग्रजांनी भारताला एक नवीन शिक्षण धोरण जाहीर केले व त्याचा परिणाम म्हणून कांही जागृत्या संस्थानिकांच्यावर झाला. मुधोजीराव हे एक शिक्षणाचे महत्व जाणणारे संस्थानधिपती होते म्हणून त्यांनी मुखत्यारी मिळाल्यानंतर संस्थानात शिक्षणप्रसार करण्याचे कार्य हाती घेतले. ते मी थोडक्यात देत आहे.

(Knowledge is power) असे अनेक शिक्षण तज्ञांनी म्हटले आहे. शिक्षणामुळे माणसाच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो त्याला चांगले वाईट समजण्याची जाण येते म्हणून अनेक प्रगत राष्ट्रामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. ज्या राष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे, ते राष्ट्र आज प्रगत समजले जाते. शिक्षणाचे महत्व मुधोजीरावांना आपल्या विद्यार्थी दशेतच त्यांच्या शिक्षकांकडून ( (Tutor ) माहित होते त्यामुळे त्यांनी आपली प्रजा सुशिक्षित झाल्याशिवाय संस्थानाची प्रगती होणार नाही म्हणून शिक्षण कार्यास प्राधान्य दिले. मुधोजीरांवानी आपल्या कारकिर्दीत फलटण संस्थानात सुरूवातीला मराठी शाळा काढल्या व नंतर काही शाळांना इंग्रजीचे वर्ग जोडले. संस्थानात इ.स. 1876 मध्ये एकूण प्राथमिक शिक्षण देणा-या 13 शाळा असून विद्यार्थ्यांची संख्या 551 होती."[5]

---

5 मुंबई प्रांताचा प्रशासकिय अहवाल 1876 – पृ.70

आपल्या संस्थानातील प्रजेस पूर्ण विद्या जरी आली नाही तरी कांहीना कांही प्रमाणात विद्या आलीच पाहिजे असे श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांना वाटत होते. किंबहूना जर संस्थानचा विकास व्हावयाचा असेल तर प्रजा ही सुज्ञ होणे आवश्यक आहे. असेच त्यांना वाटत असे, परंतु या काळातील समाज हा फारसा विद्येचे महत्व जाणून नव्हता. समाजाचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. समाजाला शिक्षणाविषयी ओढ नव्हती कारण त्या काळात लोकांच्या सर्व गरजा खेडयातच म्हणजे जेथे ते राहतात तेथेच भागविल्या जात असत. त्यामुळे शिक्षण हा विषय फारसा समाजापुढे नव्हता, परंतु फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मुधोजीराजे निंबाळकर यांचे ब्रिटिशांशी अतिशय सहकार्याचे संबंध असल्यामुळे त्यांनी शिक्षणांचे महत्व ओळखले होते.

फलटण संस्थानात मुधोजीरावाच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणप्रसार होत होता. पुढे 1881-82 अहवालावरून फलटण संस्थानात एकुण 17 शाळा होत्या तर त्या शाळेमध्ये 703 विद्यार्थी शिक्षण घेत होते. तसेच संस्थानामार्फत शिक्षण खात्यावर 2982-00 रूपये खर्च होत होते."[6]

संस्थानातील शिक्षण प्रगती पाहूण संस्थानधिपती मुधोजीराजे निंबाळकर यांनी खालील उद्गार काढले आहेत --

" The chief says, The People of this state are ingorant and uncultivated .They do not appreciate the value of education. Their ignorance couied with their poverty render the work of securing the attendance of their childern avery painful task"[7]

---

6 मुंबई प्रातांचा प्रशासकिय अहवाल 1882-83 " पृ.45

7 फलटण संस्थानचा प्रशासकिय अहवाल -1883-84 - पृ.24

अँग्लो-व्हर्नाक्युलर शिक्षणास प्रारंभ - 1881-82 (सेकंड ग्रेड)

मात्र या अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळेत इंग्रजी तिस-या इयत्तेपर्यन्त व मराठी पाचव्या इयत्तेपार्यन्तच्या शिक्षणाची सोय होती. हे ए.व्ही. स्कुल फलटण येथे होते. या शाळेत एकूण 209 विद्यार्थी होते. त्यांपैकी 27 विद्यार्थी इंग्रजी विषयाचे होते. याच शाळेत इंग्रजी विभागाला जोडूनच मराठीचे वर्ग होते. या शाळेत द्वितीय श्रेणी ए.व्ही. स्कुलचा दर्जा होता.

"There is an Anglo-vernacular School at Phaltan where English upto 3rd and varnacular to the 5th Standard is taught."[8]

संस्थानातील शिक्षणाच्या बाबतीत श्रीमंत मुधोजीराव निंबाळकर जागरूक होते. या खात्याचा कारभार व्यवस्थित चालतो किंवा नाही त्याचप्रमाणे शिक्षक आपापल्या शाळेत वेळेवर जातात किंवा नाही ? किंवा त्यांचे समोर काय अडचणी आहेत, लोकांना या शिक्षकांचे योग्य सहकार्य मिळते किंवा नाही हे पाहण्यासाठी या शिक्षण खात्यावर डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर नाचाच्या अधिका-याची नेमणूक करण्यात आलेली होती. या शिवाय हा अधिकारी फलटण येथील बुक-डेपोचा प्रमुख म्हणूनही काम पहात असे. या बुक डेपोमध्ये विद्यार्थ्यांना लागणारी पाठयपूस्तके ठेवली जात असत.

वेदशाळेची स्थापना - जुलै 1882 -

भारताची प्राचीन संस्कृति , वेद, विद्या शिकविण्यासाठी याच संस्थानामार्फत ,फलटण संस्थानात 1882 ला ही वेदशाळा सुरू करण्यात आली. शाळेत विद्यार्थ्यांना वेदाचा अर्थ, प्राचीन वाड्.मय,चार वेद व इतर धार्मिक ग्रंथाचा अभ्यास शिकवला जात असे, या वैदिक शाळेमध्ये 8 विद्यार्थी शिक्षण घेत होते. संस्थानामार्फत या शाळेचा खर्च 44 रू.14 आणे 3 पै होता. ही 1930 पर्यन्त

अस्तित्वात होती."[9] तसेच 1887 साली यजुर्वेद शाळेची स्थापना झाली, परंतु ही शाळा 1895 ला बंद पडली ."[10]

मागायवर्गियांसाठी मोफत शिक्षण– इ.स. 1892 --

संस्थानातील सर्वच समाजापर्यन्त ज्ञानगंगा जाऊन पोहोचावी कारण अज्ञानी समाजाने राष्ट्राचा विकास होत नाही. त्याचप्रमाणे इच्छा असुनही समाजातील मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून इ.स. 1892–93 मध्ये त्यांनी संस्थानातील सर्व शाळात मागासवर्गीय यांना मोफत शिक्षणाची घोषणा केली."[11]

फलटण येथे हायस्कुलची स्थापना – 1895 --

संस्थानात प्राथमिक अे.व्ही. स्कुल वैदिक शाळा होती पण हायस्कुल नव्हते ,त्यामुळे शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती इ.स. 1894 मध्ये फलटण शहराबाहेर संस्थानमार्फत 14 हजार रूपये खर्च करून हायस्कुलसाठी भव्य ईमारत बांधली व जवळ जवळ 200 विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय सुरू झाली. फलटण येथील प्रथम श्रेणी अे.व्ही. स्कुलचे " मुधोजी इंग्लीश स्कुलमध्ये रूपांतर करण्यात आले व फलटण येथे हायस्कुलची स्थापना झाली.

फलटण संस्थानच्या वार्षिक प्रशासकिय अहवालात यांसबंधी खालील माहिती मिळते--

" The most noteworthy event under the head of Instruction is the opening of the first grade Anglo-vernacular

---

9 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल 1931–32 – पृ.45

10 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल –1895–94– पृ.6

11 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल–1893–94 – पृ.21

School named " Mudhoji English School". two graduates one in arts and the other in Agricultural have been employed and provisio made for imparting tuition upto the matriculation or the University.

1896-97 शैक्षणिक स्थिति --

फलटण संस्थानात इ.स. 1896 मध्ये शाळांची संख्या 31 होती. त्यामध्ये एक हायस्कुल 27 व्हर्नाक्युलर प्राथमिक शाळा, एक मुलींची शाळा, दोन वैदिक स्कुल होते. विद्यार्थी संख्या 1127 व विद्यार्थिनिची संख्या 40 होती व या वर्षीचा एकूण खर्च रू.7,137 झाला."[13] गतवर्षी पेक्षा शाळांची संख्या 3 ने वाढली.

विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे गरीब मूलांना हरीजनांना शिक्षणाचा लाभ पूर्वी पेक्षा अधिक ध्यावा यासाठी श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी फलटण येथे हरीजनांसाठी ,मागासवर्गीयासाठी स्वतंत्र प्राथमिक शाळा सुरू केली. यापूर्वी विद्यार्थी सर्व विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षण घेत असत . खेडेगावातील प्राथमिक शाळामध्ये मात्र सर्व विद्यार्थ्यां बरोबर हे विद्यार्थी शिक्षण घेत होते. यासर्व विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण त्याचप्रमाणे शैक्षणिक साहित्य, पाट्या व पूस्तके, वह्या संस्थानामार्फत पुरविल्या जात असत.

मोफत शिक्षण - 1907 -

मुधोजीराव नाईक निंबाळकर पूरोगामी विचाराचे असल्याने 1907 मध्ये फलटण संस्थानात सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत देण्यात येईल असा जाहिर नामा त्यांनी काढला"[14]

या संपूर्ण मोफत शिक्षणाच्या धोरणामुळे फलटण संस्थानात इयत्ता पहिली पासून ते मॅट्रीक पर्यन्तच्या व शाळा अंतिम ( स्कुल फायनल) इयत्तेपर्यन्तचा शिक्षणाचा लाभ संस्थानातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मिळू लागला .त्याशिवाय आणखीन महत्वाची बाब म्हणजे फलटण संस्थानातील एकूण महसूल उत्पन्ना पैकी 51। टक्के उत्पन्न हे शिक्षण खात्यावर खर्च केले जात असे."[15]

---

13 मुंबई प्रातांचा वार्षिक प्रशा. अहवाल- 1896-97 - पृ.17

14 फलटण संस्थानाचा वार्षिक प्रका.अह. 1907-08 - पृ.10

15 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकिय अहवाल-1806-07 - पृ.13

तसेच इ.स. 1907 ला रात्रशाळा सुरू केली व अशारीतीने मुधोजीरावांच्या कारकिर्दीत पहिली पासून मॅट्रिक पर्यन्त फलटण संस्थानात शिक्षणाची सोय होऊन गरीब होतकरू मूला-मुलींस मोफत शिक्षणाची सोय झाली व अल्प का असेना शिक्षण प्रसार होत गेला.

मुधोजीराव व स्त्री शिक्षण- --

मुधोजीरावांनी आपल्या कारकिर्दीमध्ये फक्त मूलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले नाही तर मूलींनाही शिक्षण द्यावे व स्त्रीया मध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी म्हणून संस्थानात स्त्रीयांच्यासाठी स्वतंत्र शाळा काढलेल्या दिसतात. शिक्षणापासून स्त्री वर्ग वंचित राहू नये अशी महारांजाची इच्छा होती, एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब सुशिक्षित होते म्हणून फलटण संस्थानात स्त्री शिक्षण प्रसारास त्यांनी चालना दिली . सन 1881 ला फलटण येथे मुलींच्यासाठी स्वंतत्र व्हर्नाक्युलर शाळेची" स्थापना करण्यात आली "[16] . 1882-83 ला या शाळेत 35 मुलीं शिक्षण घेत होत्या . तसेच ह्या मुलींच्या शाळेसाठी फलटण येथे स्वतंत्र ईमारत बांधली.

1882 पासून संस्थानात स्त्रीयांसाठी व्यवसायिक शिक्षण देण्याचे सुरू केले. शिवणकामाचे शिक्षण देण्यासाठी 1882 ला एका शिवणकला मास्तरणीची नेमणूक केली "[17] तसेच स्त्रीयांना कशिदा काढण्याचे काम शिकवण्यात आले व संस्थानातील विवाहित मुलींना या शाळेत प्रवेश देण्यात आला "[18] .ह्या शाळेतुन शिकून गेलेल्या महिला शिवणकाम व भरतकाम करून आपला उदरनिर्वाह करू लागल्या. 1885 ला फलटण संस्थानच्या शाळेमध्ये एका स्त्रीशिक्षिकाची नेमणूक करण्यात आली."[19]

---

16 मुंबई प्रांताचा वार्षिक प्रशासकिय अहवाल- 1882 -83 - पृ. 45

17 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशा.अहवाल-1882-83- पृ.24

18 कित्ता -

19 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकिय अहवाल-1885-86 -पृ. 64

पुढे 1902 मध्ये फलटण येथील मुलींच्या शाळेमध्ये एकूण 72 विद्यार्थिनींना शिक्षण घेत होत्या तर संस्थानातील इतर प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षण घेणा–या मुलींची संख्या 23 होती " [20] तसेच 1907 पासून फलटण संस्थानात संपूर्ण मोफत शिक्षण सुरू केले व मुलींनाही सर्व मोफत योजना लागु केली त्यामुळे मुलींच्या शिक्षणात थोडी वाढ हाऊ लागली.

संस्थानातील शैक्षणिक शिष्यवृत्त्या –

मुधोजीरावांनी शिक्षण प्रसारास उत्तेजन मिळण्यासाठी कांही हुशार व गरीब मुलांना संस्थानामार्फत शिष्यवृत्त्या दिलेल्या आहेत. मॅट्रिक परीक्षेत मुधोजी हायस्कुल मधुन पहिल्या येणा–या विद्यार्थ्यास स्कॉलरशिप मिळत असे , तर 1898 ला संस्कृत स्कॉलरशिप जाहीर करून मॅट्रिक च्या परीक्षेत पहिल्या येणा–या विद्यार्थ्यास 1000–00 शिष्यवृत्ती दिली आहे. 1905 पासून पुढे उच्च शिक्षण शिष्यवृत्ती कांही विद्यार्थ्यांना दिलेली आहेत. दर महिना 20/ रूपये अशी स्कॉलरशिप श्री वेलणकर यास मंजूर केलेली आहे. [21]

संस्थानामार्फत "1912 पासून " The Emperor Georje Scholarship जाहिर झाली.

फलटण संस्थानातील विद्यार्थी मॅट्रिक व इतर परीक्षेत यश संपादन करीत होते व त्याची चर्चा सर्वत्र होत होती. सन 1912 मध्ये इग्लंड येथे राजे जॉर्ज पाचवे यांना राज्यभिषेक करण्यात आला व तदनंतर ते भारताला भेट देण्यासाठी दिल्ली येथे आले असतांना त्यांच्या आगमनाप्रित्यर्थ श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी 20 रूपये महिना शिष्यवृत्ती जाहीर केली ही शिष्यवृत्ती फलटण

---

20 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकिय अहवाल–1902–03 – पृ. 12

21 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकिय अहवाल– 1906–07– पृ.13

संस्थानातील श्री बी.एस. देशपांडे यांना देण्यात आली. श्री देशपांडे यांनी गतवर्षीच्या मॅट्रिक च्या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांत प्रथम क्रमांक मिळविला होता."[22]

तसेच सर्व शाळांचे व हायस्कुलचा निकाल उत्तमरितिने लागला असे सर्व शैक्षणिक संस्था ह्या संस्थानच्या डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांच्या नियंत्रणाखाली असता कांही शाळांना मुधोजीराव स्वतः भेटी देत व शिक्षणाचे महत्व अज्ञान जनतेस पटवुन देत त्यामुळे आधुनिक शिक्षणाचा पाया मुधोजीरावांनी फलटण संस्थानात घातला. पुढे त्यांचे वारस मालोजीराव यांनी संस्थानात महाविद्यालय काढून जनतेस उच्च शिक्षणाची सोय करून दिली.

<u>मुधोजीरावांच्या जमीन महसूल व इतर सुधारणा–</u>

फलटण संस्थानातील जनता ही प्रामूख्याने शेती व्यवसाय करणारी होती. शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. जमीन महसूल हे संस्थानचे प्रमुख उत्पन्न होते. मुधोजीरावांनी ब्रिटिश अधिका–यांच्या मार्गदर्शनानूसार संस्थानातील जमीनीचे सर्व्हे करून घेतलेला आहे व जमीनीच्या प्रतीवर त्याचा महसूल ठरविण्यात आलेला आहे. संस्थानात प्रामूख्याने पाच प्रकारच्या जमीनी दिसून येतात.

1) देणगी म्हणून दिलेल्या जमीनी
2) सेवेसाठी दिलेल्या जमीनी
3) रयतेसाठी असणा–या जमीनी
4) राखीव जमीनी
5) संस्थान प्रमूखाकडे असणा–या जमिनी.

---

22 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल–1912–13 – पृ. 3

गावपातळीवर जमीन महसूल गोळा करण्याचे काम गाव तलाटी करीत असे तर त्याला मूलकी पाटील मदत करीत असत. मामलेदार हा संस्थानच्या मुख्य कारभा-याच्या अधिकाराखाली जमीन महसूल करीत असे. फलटण संथानात सन् 1818 मध्ये एकूण 80 गावामध्ये एकूण जमीन 2019 गावर 118 बीघे 3 पांड व 5 पोली इतकी होती" [23]

संस्थानात बागायत जमीन कमी असुन जिरायत व पडीक जमीन जास्त होती. कुरणाखाली जी जमीन होती ती सन 1882-83 पासून फॉरेस्ट म्हणून संबोधण्यात आली. सन 1883-84 मध्ये फलटण संस्थानातील फॉरेस्ट जमीन एकूण 3072 एकर 12 गंठे होती. या जमीनीपासून संस्थानाला चांगले उत्पन्न मिळत होते ."[24] सन् 1898-99 मध्ये फॉरेस्ट चे उत्पन्न संस्थानला रू.1720/- 5 आणे,11 पै झाले तर खर्च रू.1294, 14 आणे 10 पै झाला" [25]

जमीन महसुल वर्षातुन दोन वेळा संस्थान मार्फत केला जात असे व सर्व साधारण सुगीच्या दिवसात हा वसूल करणे ही पध्दत होती.

<u>मुधोजीरावांच्या कारकिर्दीतील</u> -( Survey Settlement )

संस्थानात जमीनी संबंधीचे - Survey settlement सन 1869 मध्ये ब्रिटिश सरकारच्या सर्वे डिपार्टमेंटच्या मार्फत झाले. व त्यानूसार संस्थानातील शेतसा-याचे दर निश्चित करण्यात आले. त्यानूसार अधिकाल अधिक शेतसारा दर दोन रूपये आठ आणे असा होता. तर कमीत कमी एक रूपया असा होता. त्यापैकी प्रगट (Group ) पाडण्यात आलेले होते. प्रथम गट पिकाचा शेतसारा दर 2 रूपये 8 आणे , द्वितीय 2 रू. , तृतीय 1 रूपया 8 आणे , चतूर्थ 1 रूपया 4 आणे व पाचव्या गटासाठी 1 रूपया असे दर निश्चित करण्यात आले.

---

23 पूणे सातारा महाराजा दप्तर - 1154

24 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल- 1884-85 - पृ. 17

25 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल - 1898-99 - पृ. 42

त्यानंतर नवीन दराने शेतसारा निश्चित करण्यासाठी फलटण दरबारच्या विनंती ठराव नं.7259 दिनांक 17 नोव्हेंबर 1892 च्या धोरणानुसार ब्रिटिश सरकारने जे.सी. वीटकोम्ब सुपरिटेंडेंट नेटीव्ह स्टेट सर्व्हे या अधिका–याची दि. 1892 मध्ये नेमणूक करण्यात आली. सन 1894 मध्ये हे काम पूर्ण करण्यात आले " [26].

जमाबंदी–

फलटण संस्थानातील जमाबंदीचे काम मामलेदार करीत असे. परंतु सन 1883–84 मध्ये प्रथम श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी स्वतः काही गावाना भेटी देऊन तेथील पहाणी करून जमाबंदीचे काम स्वतः केले. फलटण संस्थानच्या इतिहासातील ही पहिलीच घटना की, स्वतः संस्थानच्या राजाने खेडेगावात जाऊन जमाबंदी केली. मामलेदाराच्या शिवाय कारभारी सुध्दा जमाबंदीचे काम करीत असे व खेडेगावातील दप्तर तपासत असे, त्याचप्रमाणे रयतेला दिलेल्या जमा पावत्या तपासून पहात असत" [27].

फलटण संस्थानातील महसूल दोन हप्त्यामध्ये घेतला जात असे. त्यापैकी पहिला हप्ता दरवर्षी 25 फेब्रुवारी रोजी घेतला जात असे, तर दुसरा हप्ता 25 मार्च रोजी गोळा केला जात असे. शेतसारा रोख रक्कमेत स्विकारला जात असे किंवा धान्य रूपाने सुध्दा स्विकारला जात असे. या दोन वेळा शेतसारा स्विकारण्याच्या पध्दतीमुळे शेतक–यांना शेतसारा देणे सोयीचे होत असे. शिवाय पहिले खरीपाचे पीक काढल्यानंतर शेतसारा वसूली होत असे. त्यामुळे शेतकरी हातात पीक आले असताना शेतसारा भरावयाचा असल्याने शेतसारा भरल्याविषयी कधीच टाळाटाळ करीत नव्हते. खरीप व रब्बी अशी जवळजवळ दोनही पिके तयार झालेली असताना दुसरा शेतसा–याचा हप्ता 25 मार्च रोजी वसूल केला जात असे "[28].

---

26 फलटण संस्थानाचा प्र.अहवाल – सन 1894–95 – पृ.2

27 फलटण संस्थानाचा प्र. अहवाल – सन– 1895–96 – पृ. 3

28 फलटण संस्थानाचा प्र. अहवाल – सन – 1899–1900 – पृ. 2

दुष्काळ कर्ज–तगाई --

फलटण संस्थानचा विकास 1860 नंतर म्हणजेच मुधोजीरावांच्या कारकिर्दीपासून सुरू झाला. शेतक–यांना अल्प दराने कर्ज देणे व तगाई देणे मुधोजीरावांनी सुरू केले. संस्थानात काही वेळेला दुष्काळ पडलेला दिसतो, तेव्हा मुधोजीरावांनी संस्थानचा पैसा तगईच्या रूपाने शेतक–यांना दिलेला होता. सन 1876–77 मध्ये फलटण संस्थानात दुष्काळ पडला तेव्हा संस्थानिकांनी शेतक–यांना तगाई दिली. परंतु या वर्षीचा निश्चित आकडा उपलब्ध होवू शकला नाही. परंतु सन 1883–84 मध्ये या तगाई पैकी शेतक–यांकडे 90 रूपये 8 आणे येणे होते.

1877 नंतर सन 1890 पर्यन्त संस्थानामार्फत शेतक–यांना तगाई वाटप करण्यात आले नाही. परंतु सन 1891–92 मध्ये संस्थानमार्फत शेतक–यांना तगाई पोटी रूपये 15532 चे वाटप करण्यात आले. ही तगाईची रक्कम शेतक–यांना बैल खरेदी , बी–बियाणे खरेदी साठी सुध्दा देण्यात आली होती. अशा प्रकारे दरवर्षी संस्थानमार्फत शेतक–यांना आर्थिक मदत करण्यात येत असे. सन 1893–94 मध्ये 1255 रूपये, 1894–95 मध्ये 1245 रूपये तर 1897–98 मध्ये 12258 रूपये व 1899–1900 मध्ये 20,000 रूपयांचे वाटप करण्यात आले. सन 1897–98 व 1899–1900 मध्ये तगाईच्या रकमेत फार मोठी वाढ झालेली दिसते. कारण या दोन्ही वर्षी संस्थानात दुष्काळ पडलेला होता. याप्रमाणे फलटण संस्थानामार्फत शेतक–यांना आर्थिक मदत दिली जात असे. त्याचप्रमाणे शेतक–यांना हे जे कर्ज दिले जात असे त्याची फेड शेतकरी हप्त्याहप्त्याने करीत असत"[29]

फलटण संस्थानात सन 1876–77 मध्ये मोठयाप्रमाणात दुष्काळ पडला त्यावेळी मुधोजीराव नाईक यांनी दुष्काळी कामे सुरू केली. संस्थानातील रस्ते तयार करण्याचे काम सुरू करून लोकांना रोजगार उपलब्ध केला व ह्या वर्षी वार्षिक खर्च 11199 रू. केला" [30]. पुढे 1896–97 ला परत दुष्काळ पडला त्यावेळी सुध्दा मुधोजीरावांनी संस्थानात दुष्काळी कामे काढून फलटण – पंढरपूर रस्ता दुरूस्तीचे काम हाती घेतले. त्याचप्रमाणे बाणगंगानदीवर बंधारा बांधण्याचे काम सुरू केले व संस्थानातील

---

29 Gazzttee of the Pricitenry Vol.XIX B 1904,p.42

30 मुंबई प्रां. वा.अ. सन 1876–77 – पृ. 36

अनेक लोकांना रोजगार मिळाला. दररोज 300 माणसे काम करीत होते. रू.1589 ,14 आणे 11 पै दुष्काळी कामावर खर्च करण्यात आले."[31]पुढे 1899 ला फलटण संस्थानात दुष्काळ स्थिती निर्माण झाली, सरकारने दुष्काळी कामे पुन्हा सूरू केली. जवळजवळ 1500 लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. संस्थानात Bombay Farmine Code कायदा यावर्षी सुरू करण्यात आला. त्याशिवाय फलटण–लोणंद रस्त्यावर निंभोरा येथे दुष्काळग्रस्ताना अन्नधान्य वाटपही करण्यात आले." [32]

पुढे सन 1900–1901 मध्ये पुन्हा संस्थानात दुष्काळ पडला व संस्थानातील शेतक–यांची स्थिती अत्यंत हलाखीची झाली, हे पाहून श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी शेतक–यांच्याकडे येणे असणारी बाकी (Revocery ) वसूल करणे थांबविले. दुष्काळामूळे संस्थानातील शेतक–यांचे व संस्थानचे फार मोठे नुकसान झाले. शेकरी–यांना शिवाय वसूलीमध्ये रूपयात चार आणे सूट देण्यात आली. यावर्षी रस्ता दुरूस्ती करिता रूपये 2000 खर्च करण्यात आले. दुष्काळी कामावर येणा–या लोकांची संख्या दररोजची 347 होती. महालकरी या अधिका–याने संस्थानातील 27 गावांना भेटी देऊन दुष्काळी पहाणी केली. या दुष्काळाच्या लागोपाठ वर्षामूळे संस्थानातील अनेक लोकांनी स्थलांतर केले. दुष्काळामूळे जवळजवळ 4000 जनावरे मरण पावली व तेवढीच कोंकणामध्ये स्थलांतर झाली. जनावरांच्यासाठी माळशिरस व पंढरपूर येथे जाऊन गवत व कडबा आणण्यात आला होता. यानंतर संस्थानात 4 ते 5 वर्ष शेतक–यांच्या दृष्टिकोनातून चांगली गेली. मात्र सन 1905–06 मध्ये पुन्हा पावसाचे प्रमाण घटले,त्यामूळे शेतक–यांना आपणाकडे येणे असणारा शेतसारा भरणे अशक्य झाले, यावर उपाय म्हणून संस्थानिकांनी शेतसा–यात एक रूपयामागे 6 आणे सूट म्हणून जाहीर केली. त्याचप्रमाणे निंभोरा या ठिकांनी एका धरणाचे काम सुरू करण्यात आले व निंबळक या ठिकाणी तलावाचे काम सूरू करण्यात आले या वर्षामध्ये कूशल मजूराना 8 आणे ते 12 आणे पर्यन्त तर अकूशल मजूरास 2 ते 3 आणे पर्यन्त मजूरी मिळत होती. "[33]

---

31 फलटण संस्थानातील वा.अहवाल–1896–97 – पृ. 16–18

32 फलटण संस्थानातील प्रशासकिय अहवाल–सन 1900–1901– पृ. 17

33 फलटण संस्थानातील प्रशासकिय अहवाल–सन 1906–07 –पृ.9

संस्थानातील उद्योगधन्दे --

फलटण संस्थानात सुतार काम, लोहार काम, तांबट, पाथरट, सोने-चांदी, पितळी व कथिल इत्यादी उदधोगधन्दे कमीजास्त प्रमाणात होते, त्यांना संस्थानामार्फत योग्य ते सहकार्य मिळत असे. हातमागाच्या व्यवसाय ब-यापैकी होता, फलटण संस्थानात 1903 ला 169 हातमाग होते पूढे 1911 ला 171 हातमाग झाले. कापड व्यवसायाचा संबंध मुंबईशी होता."[34]

फलटण म्युनिशिपालटीची स्थापना -(1868 )

फलटण संस्थानची राजधानी असलेले फलटण शहरात मुधोजीरावांच्या कारकिर्दीत 1868 ला फलटण म्युनिशिपालीटीची स्थापना झाली."[35] व फलटण शहराचा विकास त्या म्युनिशिपालटी द्वारे होऊ लागला. शहरातील स्वच्छता, दिवाबत्ती, रस्ते, बाजारपेठ, यांची व्यवस्था म्युनिशिपालटी द्वारे करण्यात आली. संस्थानाकडुन म्युनिशिपालटीस अनूदान मिळत असे. शिवाय म्युनशिपाल्टीचा स्वतंत्र कांही कर ही होते. "Karpatti " नावाचा कर म्युनिसिपालटीच्या कक्षेमध्ये सूरू केला. (Karpatti or a charge for Sweeping ) हा कर घेत असताना प्रथम, द्वितीय, तृतीय मे 13 पर्यन्त लोकांच्या श्रेण्या निर्माण करण्यात आल्या होत्या. यामध्ये प्रथम श्रेणी व्यक्तीकडून 5 रूपये 4 आणे, द्वितीय श्रेणी 4 रूपये 8 आणे तृतीय श्रेणीकडून 4 रूपये अशाप्रकारे 13व्या श्रेणीपर्यन्त हा कर घेतला जात असे"[36]

---

34 मुंबई प्रां.प्र. अहवाल – सन 1913-14 – पृ. 42

35 फलटण म्युनसिपाल्टीचे रेकॉर्ड –

36 फलटण संस्थानाचा वार्षिक अहवाल – सन 1883-84 – पृ. 15

पुढे सह 1891–92 मध्ये फलटण म्युनिसिपालटीने पाणी पट्टी हा नवीन कर सुरू केला.

इंग्रज व मुधोजीराव यांचे संबंध--

ब्रिटिश सरकारने मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्याशी संबंध अतिशय चांगले ठेवले व त्यांना मुंबई सरकारने मुंबई लेजिस्टटीव्ह असेंब्लीचे सदस्यत्व इ.स. 1878 होते. मुंबई लेजिसलेटीव्ह असेब्लीचे सदस्य म्हणून मुधोजीरावांनी चांगले कार्य केले. तसेच मुंबई सरकारच्या घोरणास पाठीबा दिला व ब्रिटिशांची मर्जी संपादन केली. पहिल्या महायुध्दात आर्थिक मदत मुधोजीरावांनी केलेली आहे. काही रिक्रूट .पण फलटण संस्थानातुन इंग्रजांच्या वतीने लढलेले आहेत. इ.स. 1911 ला त्यांना ब्रिटिश सरकारने सी.एस.आय.(C.S. I.) हा मानाचा किताब बहाल केला."[37] यावरून इंग्रज व मुधोजीराव नाईक निंबाळकर यांचे संबंध चांगले होते.

निधन व मूल्यमापन–

मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी जवळ जवळ 56 वर्षे फलटण संस्थानेचे अधिपती म्हणून राज्यकाभार केला, व 1916 ला त्यांचे निधन झाले. त्यांनी आपल्या ह्यातीत फलटण संस्थान हे एक प्रगतिक संस्थान बनविले . आपल्या कुवतीप्रमाणे शैक्षणिक, सामाजिक , आर्थिक व महसूली सुधारणा केल्या. मुंबई प्रांताचे गव्हर्नर ,सातारा कलेक्टर , इतर पॉलीटीकल एजंट ,इंग्रज अधिकारी यांचे संबंध स्नेहाचे व सहकार्याचे होते. त्यांची मैत्री पुढे वाढतच गेली. संस्थानाला 20 व्या शतकाच्या सुरूवातीस मिळणारा हा सत्ताधिश हा एक आधुनिक फलटण संस्थानाचा शिल्पकार ठरला. त्याने ज्या ज्या नवीन योजना , सुधारणा ,नवीन कायदे सुरू केले त्याच्यावरच उभारणी पूढे मालोजीरावाने केली व फलटण संस्थानच्या विकासाचा कळस हा मालोजीरावांच्या कारकिर्दीत घडून आला.

मुधोजीराव नाईक निंबाळकर याने फलटण संस्थानच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया घातला व त्यावर त्यांचे वारस श्रीमंत मालोजीराजे यांनी सर्वांगीण प्रगतीचा कळस चढवून फलटण संस्थान हे एक

भारतातील प्रगत संस्थान बनवले त्याचा सविस्तर वृत्तांत प्रकरण 3 व 4 मध्ये देत आहे.